नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/११/२०२५ (मंगळवार )

# मोटार सायकल चोरीचे २० गुन्हे उघड , १८ मोटर सायकल जप्त २ आरोपी अटक, काटोल पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १२/११/२०२५ रोजी पोलीस स्टेशन काटोल चे गुन्हे प्रकटीकरणाचे अधिकारी अंमलदार यांना गुप्तबातमीदारकडुन खात्रीशिर माहीती प्राप्त झाली की, आरोपी नामे १) वैभव प्रकाश कावडकर रा. रामदेवाबाबा ले आउट काटोल ता काटोल जि नागपुर आणि २) रवेश ज्ञानेश्वर पवार, रा. सारवाही ता. कारंजा जि वर्धा यांनी अनेक मोटर सायकल चोरीचे गुन्हे केले आहे. आरोपी वैभव प्रकाश कावडकर रा. काटोल हा तळयाची पार काटोल येथे येत असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाल्याने काटोल पोलीसांनी तळयाची पार काटोल येथे सापळा रचुन आरोपी वैभव प्रकाश कावडकर याला एक मोटर सायकल घेवुन येत असतांना ताब्यात घेतले. पोलीसांनी त्याला त्याचे कडे असलेल्या मोटर सायकल बाबत विचारपुस करून सदर मो.सा ची माहीती काढली असता सदर मो.सा चोरीचा गुन्हा पोलीस स्टेशन कोंढाळी येथे नोंद असल्याचे समजले. सदर आरोपी ला अटक करून त्याचे कडे सखोल चौकशी करत दिनांक १४/११/२०२५ रोजी पोलीसांनी त्याचा साथीदार रवेश ज्ञानेश्वर पवार, वय २६ वर्षे, रा. सारवाडी, ता. कारंजा जि वर्धा याला नारा फाटा, कारंजा जि वर्धा येथुन ताब्यात घेवुन अटक केली. **काटोल पोलीसांनी कौशल्यपुर्ण तपास करीत मोटर सायकल चोरीचे २० गुन्हे उघडकीस आणले. त्यापैकी १५ गुन्हे पोलीस स्टेशन काटोल येथे दाखल आहे. ३ गुन्हे पोलीस स्टेशन नरखेड येथे दाखल आहे. १ गुन्हा पोलीस स्टेशन कोंढाळी येथे दाखल आहे. तसेच १ गुन्हा पोलीस स्टेशन वाडी, नागपुर शहर येथे दाखल आहे. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन १८**

मोटर सायकल किंमती ४,९७,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच २ मोटर सायकल पोलीस स्टेशन आर्वी जि. वर्धा येथे जप्त आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन नमुद दोन्ही आरोपी पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे.



## साखळी पुरावे जोडत पोलीसांनी कळमेश्वर फेटरी येथील जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणारा जळीत ट्रक प्रकरणात अजुन एका आरोपीला केले अटक

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक १६/११/२०२५ रोजी पाहटे फेटरी येथे नागपुर ते काटोल रोडवर एक टाटा कंपनीचा ट्रक क्रमांक एम एच ४० सी.डी ५०९४ याला आग आगल्याने एकुण २९ जनावरे मृत पावली होती. तसेच ८ गोवंश जनावरे जिवंत मिळुन आले होते. नमुद प्रकरणी पोलीसांनी वाहन चालक, वाहन मालक, क्लिनर तसेच जनावरे वाहनात चढवणार मदतणीस यांना अटक केली असुन सध्या सर्व ४ आरोपी हे पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे. **सदर गुन्हयात साखळी पुरावे जोडत गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक १८/११/२०२५ रोजी पिक अप वाहन क्रं एम. एच. ४० सी.डी. ६०३५ चा चालक शोएब नौशाद सय्यद, वय २६ वर्षे, रा. लाखणी जि. भंडारा याला लाखणी येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपी कडे चौकशी केली असता नमुद आरोपीने जनावरांना गोंदिया जिल्हयातुन त्याच्या ताब्यातील पिक अप वाहन क्रं एम. एच. ४० सी.डी. ६०३५ मध्ये भरून मौजा महलगाव येथील जंगल परीसरात ट्रक क्रमांक एम एच ४० सी.डी ५०९४ पर्यंत पोहचवुन दिले अशी माहीती दिली. आरोपीला अटक केली आहे. आज रोजी नमुद आरोपीला मा. न्यायालयाने दिनांक २०/११/२०२५ रोजी पर्यंत ३ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

## कन्हान पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील २ गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, रामटेक यांनी पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतील २ आरोपीतांना नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले.**

१. आरोपी नामे शुभम राजेश सोमकुवर, वय २८ वर्ष, रा. पाण्याचा टाकी जवळ, सिहोरा ,कन्हान याचेवर वाहन चोरी, रेती चोरी तसेच आरोपी नामे आशिष गजानन जाधव, वय २८ वर्ष, रा. विवेकानंद नगर, कन्हान यांचावर पोलीस स्टेशन कन्हान अरोली उमरेड येथे रेती

चोरी अशा प्रकारेचे गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी हे गुन्हे करण्याच्या सवईचे असल्याने ते अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितात तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद दोन्ही आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव कन्हान पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, रामटेक यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **आरोपी क्रं १. आरोपी नामे शुभम राजेश सोमकुवर, वय २८ वर्ष, रा पाण्याचा टाकी जवळ, सिहोरा, कन्हान आणि २. आशिष गजानन जाधव, वय २८ वर्ष, रा. विवेकानंद नगर, कन्हान यांना ३ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी.**



आरोपी शुभम राजेश सोमकुवर



आरोपी आशिष गजानन जाधव

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच दारू बाळगुण विक्री तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २७ गुन्हे नोंद.

**दिनांक १७/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, तसेच ईतर साहीत्य असा एकुण ३,०३,०१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण २ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे ३ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे १ गुन्हा नोंद आह. पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन अरोली येथे १ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २७ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत १९,२६० मिली देशी दारू, २,३७२ लीटर मोहाफुल दारू , १,५०० लिटर सडवा तसेच ईतर साहीत्य असा एकुण ३,०३,०१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नााशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## कळमेश्वर बायपास ते सेलु मार्गावर नागरिकांनी रॉग साईड (चुकीच्या बाजुने) न जाता यु टर्न चा वापर करावा.

दिनांक १५/११/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात कलमेश्वर बाईपास से सेलु तक दिक्कते, नागरिकों को करना पड रहा परेशानी का सामना, सर्विस रोड के अभाव मे मार्ग पर बढती जा रही दुघर्टनाए अशा मथळाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर प्रकरणाची सविस्तर

माहिती अशी आहे की, कळमेश्वर ते अमरावती रोडवर सेलु पर्यंत रॉग साईड ने वाहने नेण्याकरीता एका ठिकाणी कट होता त्या कट चा नागरिक वापर करत होते तो कट बंद करण्यात आला आहे. तसेच तेथे झेब्रा क्रॉसिंग आखण्यात आल्या आहेत. सदर ठिकाणी अपघात प्रवण क्षेत्र असे फलक देखील लावण्यात आले आहे.

नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना सुचित करण्यात येते की, रॉग साईड चा वापर न करता यु टर्न चा वापर करावा. वाहतुक नियमांचे पालन करावे.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६४५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १८/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६४५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३१ आरोपी अशा एकुण ६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २६ आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २९ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**